नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २० Issue - 20 | वार शुक्रवार दि. ६ जून २०२५ Blow- Friday Date 6 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# सावधान! राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढणार, अतिवृष्टी होणार

## १३ जून ते १८ जूनच्या दरम्यान खूप मुसळधार पाऊस पडणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कालपासून म्हणजे ४ जूनपासून पाऊस पुन्हा सक्रिय झाला आहे. सध्या काही भागात पाऊस पडत आहे, तर काही भागात पावसानं उगडीप दिली आहे. गेल्या काही दिवसात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. नदी नाले दुथडी भरुन वाहत आ-हेत. धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ होत आहे. दरम्यान, अशातच राज्यातील २६ जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आल्याची माहिती हवाम ान अभ्यासक पंजाबराव डख (झींपक्षरलीरे ऊज्ञह) यांनी दिली आहे. आज वादळी वारे, विजा आणि मध्यम पर्जन्याची शक्यता आहे.

पंजाबराव डख यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात ७ ते १० जूनच्या दरम्यान भाग बदलत पाऊस पडणार आहे. शेतकऱ्यांचे १० जून पर्यंत शेत नाही तयार झाले तर १०, ११ आणि १२ जून तीन दिवस शेत तयार करायला पुन्हा चान्स मिळेल. राज्यात १३ ते १८ जून मुसळधार पाऊस पडणार आहे. ठिकठिकाणी वढे नाले वाहतील असा पाऊस पडणार आहे.

पूर्व विदर्भ, पश्चिमी विदर्भ, दक्षिण महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, कोकणपट्टी, खान्देश, मराठवाडा सगळ्या विभागामध्ये ७, ८, ९ जून दरम्यान भाग बदलत पाऊस पडणार आहे. पण त्याच्यानंतर १३ जून ते १८ जूनच्या दरम्यान खूप मुसळधार पाऊस पडणार, तर काही ठिकाणी अतिवृष्टी देखील होईल. म्हणजे वढे नाले वाहतील असा पाऊस पडणार आहे.

गेल्या काही दिवसापासून राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस कोसळताना दिसत आहे. काही भागात अतिवृष्टी देखील झाली आहे. नदी नाले दुधतडी भरुन वाहत आहेत. दरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. तसेच काही भागात जास्त पाऊस पडल्यामुळं शेती पिकांचे देखील नुकसान झाले आहे. अशातच पुन्हा राज्यात मुसळधार पा-वसाचा इशारा देण्यात आली आहे.



### कोणकोणत्या जिल्ह्यात पडणार पाऊस?

■ **कोकण विभाग**
ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी
हलका ते मध्यम पाऊस .

■ **पश्चिम महाराष्ट्र**
पुणे, सातारा, सांगली, सोलापूर
घाटभागात वाढलेला पर्जन्य अंदाज .

■ **मराठवाडा व विदर्भ**
नाशिक, धुळे, जळगाव, अमरावती, नागपूर, वर्धा
विजेसह मध्यम पाऊस, वाऱ्याचा वेग ३० ते ५० किमी/तास .

■ **अलर्ट नसलेले जिल्हे**
गोंदिया, भंडारा, नंदुरबार, लातूर - कोरडे हवामान .

**७ ते १० जूनच्या दरम्यान भाग बदलत पाऊस पडणार**

# बंगळुरूचे पोलिस आयुक्त, एसीपी, डीसीपी सगळेच निलंबित, आरसीबीविरोधात गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बंगळुरू चेंगराचेंगरीसंबंधी कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री सिद्धारम य्या यांनी मोठा निर्णय घेतला आहे. बंगळुरू शहराचे पोलिस आयुक्तांना त्यांनी निलंबित केलं आहे. तसेच अतिरिक्त पोलिस, एसीपी, डीसीपी यांच्यासह स्थानिक पोलिस स्थानकाच्या पोलिस निरीक्षकालाही निलंबित केलं आहे. त्याचसोबत आरसीबी संघ आणि इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने १८ वर्षांनंतर आयपीएल जिंकल्यानंतर बंगळुरूतील चिन्नास्वामी स्टेडिअमवर एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्टेडिअमच्या बाहेर मोठी गर्दी झाल्यानंतर चेंगराचेंगरीची घटना घडली. त्यामध्ये ११ जणांचा बळी गेला तर ५० हून अधिक लोक जखमी झाले. यानंतर आता कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी कडक कारवाई केली आहे.

बंगळुरू चेंगराचेंगरी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या म्हणाले, कबन पार्क पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक, स्टेशन हाऊस मास्टर, स्टेशन हाऊस ऑफिसर, एसीपी, सेंट्रल डिव्हिजन डीसीपी, क्रिकेट स्टेडियमचे प्रभारी, अतिरिक्त पोलिस आयुक्त, पोलिस आयुक्त यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे.

क्यूबन पार्क पोलिस स्टेशनम ध्ये आरसीबी, डीएनए (इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी), केएससीए प्रशासकीय समिती आणि इतरांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे. या चेंगराचेंगरीच्या घटनेत गुन्हेग-ारी निष्काळजीपणाचा आरोप एफआयआरमध्ये करण्यात आला आहे. १०५, १२५ (१) (२), १३२, १२१/१, १९० ठ/ ३ (५) या कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचा मोठा निर्णय**

चौकशीसाठी समिती नेमली बंगळुरू चेंगराचेंगरीच्या घटनेची चौकशी करण्यासाठी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश मायकल डी कुन्हा यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. या समितीला ३० दिवसांच्या आत आपला अहवाल देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच या घटनेला जे कुणी कारणीभूत असतील त्यांना अटक करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री सिद्धारमय्या यांनी दिली.

# खेळणं, जिंकणं यापेक्षा लोकांचा जीव महत्त्वाचा : गौतम गंभीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बंगळुरू : तब्बल १८ वर्षांच्या प्रतिक्षेनंतर आयपीएल चॅम्पियन ट्रॉफी जिंकण्याचा बहुमान रायल चॅलेंजर्स बंगळुरुच्या संघाला मिळाला. पंजाब विरुद्ध बंगळुरु यांच्यातील अंतिम साम न्यात बंगळुरुने विजयी पताका फडकवली अन् आरसीबीचं विराट स्वप्न पूर्ण झालं. माजी कर्णधार विराट कोहलीने मैदानावरच हात टेकवत डोळ्यातून अश्रू ढाळले. त्यानंतर, आरसीबी चाहत्यांनी देशभर जल्लोष साजरा केला. चिन्नास्वामी स्टेडियम आणि बंगळुरुच्या रस्त्यावर चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. मात्र, १८ वर्षांनी मिळालेल्या या यशाला चेंगराचेंगरीच्या घटनेनं गालबोट लागलं. दरम्यान, या घटनेनंतर आरसीबीचा दिग्गज फलंदाज विराट कोहली आणि त्याची पत्नी अनुष्का शर्मा यांनी सोशल मीडियावर आपल्या भावना व्यक्त केल्या. तर, टीम इंडियाचा कोच गौतम गंभीरनेही त्याच्या स्टाईलने परखडपणे भाष्य करत, खेळणं, जिंकणं महत्त्वाचं आहे, पण त्यापेक्षा लोकांचा जीव जास्त महत्त्वाचा असल्याचे म्हटले. भारतीय क्रिकेट संघाचा प्रशिक्षक गौतम गंभीरने बंगळुरूतील चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेवर परखडपणे भाष्य केलं आहे.



मी याअगोदरच सांगितलेलं आहे की, मी अशा रोड शोंवर विश्वास ठेवत नाही. खेळणं गरजेचं आहे, जिंकणं गरजेचं आहे, पण त्यापेक्षा जास्त गरजेचं, जास्त महत्त्वाचा आहे तो लोकांचा जीव. जर अशा परिस्थितीला नियंत्रण ठेवण्यास सक्षम नसू तर असे रोड शोंचे आयोजन न केलेलं बरं, अशा शब्दात गौतम गंभीरने बंगळुरुच्या विजयानंतर झालेल्या सेलीब्रेशन आणि रोड शोच्या चेंगराचेंगरीवर स्पष्टपणे मत मांडले. दरम्यान, आरसीबीच्या (ठउइ) विजयी सेलिब्रेशनदरम्यान हजारो चाहते एकत्र आल्याने चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर अचानक गोंधळ निर्माण झाला. अफवा आणि व्यवस्थेचा अभाव यामुळे ही दुर्घटना घडल्याचे सांगितले जात आहे. आरसीबने खझङ ट्रॉफी जिंकल्यानंतर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुच्या (ठउइ) चाहत्यांनी बंगळुरु शहरात मोठ्या उत्साहात विजय साजरा केला. मात्र, या आनंदाला गालबोट लागलं, येथील चिन्नस्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत ११ निष्पाप क्रिकेट चाहत्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्घटनेत अनेकजण जखमीही झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

**माझ्याकडे बोलण्यासाठी शब्दच नाहीत : विराट**

विराटने ट्विट शेअर करत म्हटले की, 'माझ्याकडे बोलण्यासाठी शब्दच उरले नाहीत... मी पूर्णपणे तुटून गेलो आहे. विराट कोहलीनंतर त्यांची पत्नी आणि प्रसिद्ध अभिनेत्री अनुष्का शर्मा हिनेही आरसीबी संघाच्या भावना शेअर करताना ३ तुटलेले हृदय पोस्ट केले.

# पंतप्रधान मोदी आज काश्मीरमध्ये; पहलगाम, ऑपरेशन सिंदूरनंतर पहिलाच दौरा

जम्मू : पंतप्रधान नरेंद्र मोदी आज, शुक्रवारी (दि. ६) जम्मू-काश्मीर दौऱ्यावर जाणार असून त्यासाठी बहुस्तरीय कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. या दौऱ्यादरम्यान पंतप्रधान बहुप्रतीक्षित काश्मीर रेल्वे मार्गाचे उद्घाटन करणार आ-हेत. तसेच कटरा येथे ४६ हजार कोटींचे विविध विकास प्रकल्पांचे यावेळी ते लोकार्पण करतील. श्रीनगर ते कटरा वंदे भारत गाडीला हिरवा झेंडा दाखवण्यात येणार असून शनिवारपासून या गाडीची सेवा सुरू होईल. पह-लगाम दहशतवादी हल्ला आणि त्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सशस्त्र दलांच्या 'ऑपरेशन सिंदूर'नंतर मोदींचा केंद्रशासित प्रदेशातील हा पहिलाच दौरा असेल. २७२ किमी लांबीचा उधमपूर, श्रीनगर, बारामुल्ला रेल्वे मार्ग पूर्ण झाला असून त्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी अभियांत्रिकी उत्कृष्टतेचे प्रतीक असलेला चिनाब पूल आणि भारतातील पहिल्या केबल-स्टेड अंजी पुलाचे उद्घाटन करतील. त्यानंतर वंदे भारत गाड्यांना हिरवा झेंडा दाखवतील.

**इगतपुरी येथे हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे लोकार्पण**

# समृद्धी महामार्ग' वाढवण बंदराशी जोडणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी म हामार्ग राज्याच्या विकासात महत्वाची भूमिका बजावणार आहे. हा महामार्ग राज्याच्या समृद्धीचा कॉरिडॉर ठरणार आहे. येत्या काळात या महामार्गाला वाढवण बंदराशी जोडण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे लोकार्पण व सायन पनवेल महामार्गावरील ठाणे खाडी पूल क्रमांक तीन दक्षिण वाहिनीचा लोकार्पण सोहळा दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री दाद-ाजी भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, अन्न व औषध प्रशासन, विशेष साहाय मंत्री नर-हरी झिरवाळ, सार्वजनिक बांधकाम (सा. उ.) राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, आमदार निरंजन डावखरे, आमदार नितीन पवार, आमदार सरोज अहिरे, आमदार हिरामण खोसकर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, म हाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक आणि उपाध्यक्ष अनिल गायकवाड आदी उपस्थित होते.

**समृद्धी महामार्गासह पालखी मार्गावर वन विभागाच्या माध्यमातून वृक्षारोपण**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणा-ले, समृद्धी महामार्गासाठी विक्रमी वेळेत भूसंपादन करण्यात आले आहे. या मार्गामुळे विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रासह राज्यातील २४ जिल्हे जेएनपीटी बंदराशी जोडले गेले आहेत, आता हा महामार्ग वाढवण बंदराशी जोडला जाईल. ७०१ किलोमीटर लांबीच्या या म हामार्गासाठी ५५ हजार ३३५ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे.

समृद्धी महामार्गाचा ७६ किलोम ीटर मार्ग नाशिक आणि ठाणे जिल्ह्या-तून जातो. या भागात सह्याद्रीच्या डोंगर रांगा असून अतिशय खडतर भौगोलिक परिस्थितीत मार्ग काढत म हाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हे अभियांत्रिकी आव्हान पेलले. यातील इगतपुरीजवळील बोगदा हा ८ किलोमीटर लांबीचा असून तो राज्यातील सर्वाधिक लांबीचा आणि देशातील सर्वाधिक रुंदीचा बोगदा आहे.




समृद्धी महामार्गासह पालखी मार्गावर वन विभागाच्या माध्यम ातून वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेतला आहे. या महामार्गामुळे एक हजार शेततळी तयार झाली आ-हेत. याबरोबरच दर ५०० मीटरवर जलपुनर्भरण व्यवस्था करण्यात आली आहे. या महामार्गालगत सौर ऊर्जा निर्मिती करण्यात येणार आहे. त्यापैकी ३५ मेगावॉट प्रकल्पाचे काम सुरू आहे. महामार्गालगत गेल कंपनीतर्फे गॅस वाहिनी टाकण्यात आली आहे. या माध्यमातून नव्याने विकसित होणाऱ्या स्टीलसिटी गडचिरोली पर्यंत गॅस पोहोचविता येईल. तसेच धार्मिक आणि पर्यटनस्थळे या मार्गामुळे जोडली आहेत. वाशी खाडीवरील तिसऱ्या पुलामुळे वाहतूक सुलभ होण्यास मदत होईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

महामार्ग अपघातमुक्त करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. या महामार्गामुळे वन्यजीवांच्या संचारात अडथळे येऊ नयेत म्हणून १०० प्रकारच्या संरचना तयार करण्यात आल्या आहेत. देशात अशा प्रकारची रचना प्रथमच साकारण्यात आली आहे. त्यामुळे वन्य प्राण्यांचा संचार विना व्यत्यय सुरू आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

आगामी काळात शक्तिपीठ महाम ार्ग साकारण्यात येणार आहे. या म हामार्गामुळे मराठवाड्यातील आर्थिक चित्र बदलण्यास मदत होईल, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.

**कृषी, पर्यटन विकास, औद्योगिकीकरणाला चालना**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, समृद्धी महामार्गामुळे वेळ, इंधनाची बचत होणार आहे. प्रदूषणास आळा बसणार आहे. या महामार्गामुळे कृषी, पर्यटन विकास, औद्योगिकीकरणाला चालना मिळणार आहे. पर्यावरणपूरक असा महामार्ग राज्याच्या विकासात गेम चेंजर ठरेल. तसेच नाशिक जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. समृद्धी महामार्ग मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण भागासाठी लाभदायक ठरेल, त्याचप्रमाणे शक्तिपीठ महाम ार्ग उपयुक्त ठरेल. या महामार्गावर प्रवाशांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. या महामार्गावर वाहन चालकांनी वेग मर्यादेचे व वाहतूक निमयांचे पालन करावे, असेही आवाहन उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले.

**अन्य प्रकल्पांनाही गती**

जागतिक पर्यावरण दिनाच्या शुभेच्छा देत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, पर्यावरण संवर्धनासाठी यंदा १० कोटी रोपांच्या लागवडीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. या म हामार्गानंतर आता राज्यातील अन्य प्रकल्पांनाही गती देण्यात येईल, असे सांगत त्यांनी या प्रकल्पासाठी परिश्रम घेणारे अधिकारी, कर्मचारी आणि कामगारांचे उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी कौतुक केले.

यावेळी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी समृद्धी महामार्गाचे लोकार्पण केले. त्यानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्यासह मान्यवरांनी महामार्गाची पाहणी केली. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस आणि उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी वाहनाचे सारथ्य केले.

दैनिक
यश सिद्धि न्यूज

शुक्रवार दि. ६ जून २०२५ 

संपादकीय....

## जीव महत्त्वाचा

तब्बल १८ वर्षांच्या प्रतिक्षेनंतर आयपीएल चॅम्पियन ट्रॉफी जिंकण्याचा बहुमान रायल चॅलेंजर्स बंगळुरुच्या संघाला मिळाला. पंजाब विरुद्ध बंगळुरु यांच्यातील अंतिम सामन्यात बंगळुरुने विजयी पताका फडकवली अन् आरसीबीचं विराट स्वप्न पूर्ण झालं. माजी कर्णधार विराट कोहलीने मैदानावरच हात टेकवत डोळ्यातून अश्रू ढाळले. त्यानंतर, आरसीबी चाहत्यांनी देशभर जल्लोष साजरा केला. चिन्नास्वामी स्टेडियम आणि बंगळुरुच्या रस्त्यावर चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. मात्र, १८ वर्षांनी मिळालेल्या या यशाला चेंगराचेंगरीच्या घटनेनं गालबोट लागलं. दरम्यान, या घटनेनंतर आरसीबीचा दिग्गज फलंदाज विराट कोहली आणि त्याची पत्नी अनुष्का शर्मा यांनी सोशल मीडियावर आपल्या भावना व्यक्त केल्या. तर, टीम इंडियाचा कोच गौतम गंभीरनेही त्याच्या स्टाईलने परखडपणे भाष्य करत, खेळणं, जिंकणं महत्त्वाचं आहे, पण त्यापेक्षा लोकांचा जीव जास्त महत्त्वाचा असल्याचे म्हटले. भारतीय क्रिकेट संघाचा प्रशिक्षक गौतम गंभीरने बंगळुरूतील चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेवर परखडपणे भाष्य केलं आहे. मी याअगोदरच सांगितलेलं आहे की, मी अशा रोड शोंवर विश्वास ठेवत नाही. खेळणं गरजेचं आहे, जिंकणं गरजेचं आहे, पण त्यापेक्षा जास्त गरजेचं, जास्त महत्त्वाचा आहे तो लोकांचा जीव. जर अशा परिस्थिताला नियंत्रण ठेवण्यास सक्षम नसू तर असे रोड शोंचे आयोजन न केलेलं बरं, अशा शब्दात गौतम गंभीरने बंगळुरुच्या विजयानंतर झालेल्या सेलीब्रेशन आणि रोड शोच्या चेंगराचेंगरीवर स्पष्टपणे मत मांडले.

# पारधी समाजातील तरुणानी शिक्षण घेवून चोरीचा शिक्का पुसून काढावा : पद्मश्री गिरीश प्रभुणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : महामानव डॉ.बाबासाहेबआंबेडकर यानी संविधानाच्या माध्यमातून सर्वांसाठी शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिलेली असून परधी समाजातील तरुणानी अवैध धंदे बंद करून शिक्षण घेवून भारतीय सैन्य दलात भरती होऊन देशसेवा कारून, तसेच प्रशासकीय सेवेत रुजू होऊन, वेगवेगळे छोटे मोठें व्यवसाय करून देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत अग्रेसर असलेल्या पारधी समाजाच्या कपाळावर इंग्रजाणी मारलेला चोरीचा शिक्का पुसून काढावा आणि स्वतःची पर्यायाने समाजाची प्रगती साधण्याचा प्रयत्न करावा असे प्रतिपादन पुनरुत्थान समरसता कुरूकूलम पिंपरी - चिंचवड पुणे चे संस्थापक तथा क्रांती वीर चाफेकर स्मरक समितीचे निर्माते पद्मश्री पुरस्कार प्राप्त जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते गिरीश प्रभुणे काका यानी इटकळ ता.तुळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.






आदिवासी पारधी समाज बहूउद्देशिय सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्य अणदूर ता. तुळजापूर च्या वतीने इटकळ येथिल एकता मंगल कार्यालयाच्या सभाग्रहात आदिवासी पारधी समाजाचा मेळवा व पद्मश्री गिरीश प्रभुणे यांचा जाहीर नागरी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी गिरीश प्रभुणे काका मेळाव्याला मार्गदर्शन करताना बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अणदूर येथिल जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते महावीर कंदले हे होते तर प्रसंगी जेष्ठ मार्गदर्शक पद्मश्री गिरीष प्रभुणे यांचा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष पंडित भोसले यांच्या हस्ते तर महावीर कंदले, महादेव गायकवाड, सुनीता भोसले,रिपाइं (आठवले) चे जिल्हा सचिव एस.के.गायकवाड,जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, रिपाइचे जिल्हा युवा कार्याध्यक्ष अरूण लोखंडे, आदींच्या प्रमुख उपस्थित मानाचा फेटा, शाल, पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कुदन भोसले,पत्रकार किशोर धुमाळ, रिपाइंचे राजेंद्र शिंद, महादेव कांबळे आदिवासी पारधी सामाजिक सघटनेचे प्रदिप भोसले, रवी भोसले, बाळु भोसले, जेवर काळे,तनुजा काळे,चित्रा काळे, रमेश पवार, जगन्नाथ शिंदे, उमेश भोसले, सिद्धाराम चव्हाण, पिंकी शिंदे, सचिन शिंदे, सह कार्यकर्ते महिला मोठ्या संखेने उपस्थित होते.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त निफाड येथे वृक्षारोपण

## संत मंहंतांच्या उपस्थितीत सात दिवसात १०००झाडे लावण्याचा नगरपंचायतचा संकल्प





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायत च्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त संत महंतांच्या प्रमुख उपस्थितीत व नगरपंचायत च्या नगराध्यक्षा शारदा नंदकुमार कापसे, उपनगराध्यक्ष अनिल कुंदे, मुख्याधिकारी अमोल चौधरी, नगरसेविका रत्नमाला कापसे, यांच्या हस्ते जनार्दन स्वामी आश्रम पर्णकुटी, शहरातील रोडच्या कडेला, व मोकळ्या जागेत वृक्षारोपण करण्यात आले, यावेळी वड, पिंपळ, लिंब, शमी, आंबा, अशा जातीची १००० झाडे येत्या ७ दिवसात लावण्यात येणार असून आत्तापर्यंत ४५० झाडे लावण्यात आले आहे, माजी वसुंधरा अभियान ६.० एक पेड मा के नाम लगाये ,असा संदेश यावेळी देण्यात आला , यावेळी प्रत्येक झाडाला सुरक्षा जाळ्या बसविण्यात आल्या आहेत,

याप्रसंगी संत जनार्दन स्वामी महाराज यांचे शिष्य प.पु. गणेश गिरीजी महाराज निफाड आश्रम, ओंकारेश्वर येथील महंत जगदीशानंद महाराज, माऊली महाराज, रामप्रसाद महाराज, स्वच्छता निरीक्षक विनोद त्रिभुवन, शरद काकुळते, कुणाल खाडे, प्रवीण पठाडे, जयसिंग ठाकरे, दिनेश सोनवणे व निफाड नगरपंचायत चे कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना स्वच्छ भारत हरित भारत प्रतिज्ञा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

परिसरात जास्तीत जास्त वृक्ष लागवड करून निसर्गाचा समतोल राखणे महत्त्वाचे असून वृक्ष लागवड केल्याने परिसराची शोभा वाढते ,सर्व वृक्षांची काळजी घेणे व ती वाढविणे हे प्रत्येक नागरिकाचे काम असून भविष्यात नक्कीच वृक्षांमुळे परिसराला महत्त्व प्राप्त होईल पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने हातभार लावावा व आपला परिसर हिरवा गार करावा ,

– प.पु.गणेश गिरीजी महाराज
निफाड आश्रम

# सी.एस.आर. फंडातुन दिला स्वेरीसाठी रु. २० लाखांचा निधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : शिक्षण क्षेत्रात विविध प्रयोग करून विद्यार्थ्यांना प्रगतीच्या वाटेवर नेवून सोडणाऱ्या स्वेरीचे नाव आता राज्याबरोबरच देशभरात झाले आहे, हे पाहून राज्याच्या राजकीय पटलावर विविध विषय हाताळताना नेहमी लक्षवेधी भूमिका मांडणारे पंढरपूर- मंगळवेढा विधानसभेचे सदस्य आमदार समाधान आवताडे यांनी स्वेरीतील शैक्षणिक उपक्रमांना आणखी हातभार लावला आहे. आमदार आवताडे यांनी स्वेरीसाठी रु. २० लाखांचा निधी दिला असून यापैकी इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स'साठी रु. १६ लाख आणि एमबीए विभागासाठी रु. ४ लाखांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. आमदार आवताडे हे सामाजिक, राजकीय क्षेत्राबरोबरच आता शैक्षणिक क्षेत्रात देखील महत्वपूर्ण योगदान देत आहेत. शैक्षणिक क्षेत्रात अशा निधीच्या उपलब्धतेमुळे प्रगतीचा वेग अजून वाढणार आहे, हे निश्चित.






गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागात 'इलेक्ट्रिक व्हेईकल सेंटर ऑफ एक्सलन्स'ची स्थापना करण्यात आली असून, या उपक्रमात श्री. एस. एम. आवताडे प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीचे उल्लेखनीय योगदान लाभले आहे. या 'सेंटर ऑफ एक्सलन्स'च्या स्थापनेसाठी आणि मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन (एमबीए) विभागाच्या स्टॅटिस्टिकल पॅकेज फॉर सोशल सायन्स (एस.पी.एस.एस) सॉफ्टवेअर साठी श्री. एस. एम. आवताडे प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडून एकूण रु.२० लाखांचे आर्थिक सहाय्य मिळाले असून, हा उपक्रम समाजहितासाठी तांत्रिक शिक्षणात प्रत्यक्ष गुंतवणुकीचा आदर्श ठरतो. सामाजिक बांधिलकीतून शिक्षण क्षेत्रात हातभार लावत आमदार आवताडे यांनी विद्यार्थ्यांसाठी उच्चस्तरीय प्रयोग सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या सेंटर ऑफ एक्सलन्सचे उदघाटन माजी तंत्रशिक्षण संचालक डॉ. एन. बी. पासलकर व श्री एस. एम. आवताडे प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे संचालक व उद्योजक संजय आवताडे यांच्या हस्ते झाले. या सेंटर ऑफ एक्सलन्समुळे आता विद्यार्थी थेट इलेक्ट्रिक वाहनांच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर प्रयोग करू शकणार आहेत. यासाठी या प्रयोगशाळेत लिथियम आयन सेल टेस्टिंग युनिट, लिथियम आयन बॅटरी पॅक टेस्टिंग युनिट, लिथियम आयन बॅटरी मॅन्युफॅक्चरिंग युनिट आणि इलेक्ट्रिक व्हेईकल डव्हान्स पावरट्रेन बेंच ही चार अत्याधुनिक यंत्र आणण्यात आली असून यामध्ये बॅटरी मॅनेजमेंट सिस्टम, मोटर कंट्रोल, चार्जिंग यंत्रणा, इन्व्हर्टर ड्राइव्हर्स यासारख्या प्रणालींवर काम करताना विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्य प्राप्त होणार आहेत, जे विद्यार्थ्यांना सतत बदलणाऱ्या उद्योगविश्वात सक्षमपणे उभे राहण्यासाठी उपयुक्त ठरतील. यासाठी बेंगळुरू मधील प्रसिध्द असलेल्या डेसिबल्स लॅब प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने अत्याधुनिक मशीन्स बसविण्यासाठी तांत्रिक योगदान दिले आहे. या 'सेंटर ऑफ एक्सलन्स'च्या स्थापनेसाठी स्वेरीच्या प्रा. डी. डी. डफळे व प्रा.मंजीत कुमार या प्राध्यापकांना बेंगळुरूमध्ये विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या नियोजनबद्ध मार्गदर्शनाखाली, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने, उपप्राचार्य डॉ. मिनाक्षी पवार व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी.एम. पवार यांच्या नेतृत्वाखाली विभागप्रमुख डॉ. बादल कुमार, इन्फ्रास्ट्रक्चर अधिष्ठाता डॉ. डी. ए. तंबोळी व प्रा. एस. एस. कवडे यांनी 'सेंटर ऑफ एक्सलन्स'साठी परिश्रम घेतले. आमदार आवताडे यांचे हे सामाजिक योगदान शिक्षण क्षेत्रात निश्चितच प्रेरणादायी ठरून इतर उद्योजकांनाही अशाच सकारात्मक उपक्रमांसाठी प्रेरणा देणारे ठरणार आहे. सी.एस. आर. फंडातुन स्वेरीसाठी रु. २० लाखांचा निधी दिल्याबद्धल संचालक व उद्योजक संजय आवताडे यांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी माजी शास्त्रज्ञ डॉ. व्ही. के. सुरी, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त एन.एस. कागदे, विश्वस्त एच.एम. बागल, युवा विश्वस्त प्रा. सुरज रोंगे, संशोधन अधिष्ठाता डॉ. ए.पी. केने व इतर प्राध्यापक उपस्थित होते.

## कल्याणशेट्टी महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम

# छत्रपती शिवाजी महाराजांचा पर्यावरणवादी दृष्टिकोन स्वीकारावा : प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्यात वृक्षारोपण करण्याचा आदेश दिला होता. वृक्षाचे जतन आणि संवर्धन व्हावे म्हणून अधिकाऱ्यांना आदेश देखील दिले होते. पर्यावरण संतुलन अबाधित राहावे म्हणून त्यांनी किल्ल्यावर वृक्ष लागवड केली. त्यांचा हा दृष्टिकोन सर्वांनी स्वीकारला पाहिजे, असे प्रतिपादन इतिहास संशोधक प्रा डॉ चंद्रकांत चव्हाण यांनी व्यक्त केले.




महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. यावेळी डॉ आप्पासाहेब देशमुख, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले छ. शिवाजी महाराज व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या राज्यात वृक्ष संवर्धन करून पर्यावरण संतुलित ठेवण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. आता मात्र नैसर्गिक स्थिती विचित्र झाली असून निसर्गातील ओझोन वायूचे प्रमाण घटत चालले आहे. त्यामुळे पर्यावरणास हानी पोहोचत आहे. अशावेळी वृक्षाची लागवड करणे आवश्यक आहे.

मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, निसर्गातील पाने, फुले झाडांमुळे जीवन आनंदी होते हिरवा निसर्ग पाहिल्यानंतर मनातील अंतःकरणाचा ओलावा सुकावून सोडतो म्हणून पर्यावरण रक्षणासाठी झाडे जगवली पाहिजेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, आभार कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार यांनी मानले.

### विद्यापीठाचा वृक्ष लागवडीचा संदेश अभिमानास्पद

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरचे कुलगुरू डॉ प्रकाश महानवर यांनी सुमारे दहा हजार वृक्षांची लागवड केले आहे. वृक्ष जतन व संवर्धनाचा संदेश विद्यापीठाकडून शिक्षक विद्यार्थी व महाविद्यालयांना दिल्यामुळे शेतशिवारातून विद्यार्थी झाडे लावत आहेत तर महाविद्यालयातून देखील वृक्षाची लागवड केली जात आहे. हा स्तुत्य उपक्रम अभिमानास्पद आहे असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### अनुसूचित जातींचा ४१० कोटींचा निधी वळवला

मुंबई : मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांना मे महिन्याचे अनुदान देण्यासाठी अनुसूचित जाती घटकांसाठी असलेला ४१० कोटी ३० लाख रुपये इतका निधी वळविण्यास गुरुवारी राज्य सरकारने मंजुरी दिली. सामाजिक न्याय विभागाकडून लाडकी बहीण योजनेसाठी ३९६० कोटी रुपये राखून ठेवण्यात आले असून, त्यातील ४१० कोटी रुपये गुरुवारी महिला व बालविकास विभागाकडे वळते करण्यात आले. मे महिन्याचा हप्ता देण्यासाठी हा निधी लाभार्थ्यांना वितरीत करण्यास महिला व बालविकास विभागाने मंजुरीही दिली. विभागाने अनुसूचित जातीच्या व नवबौद्ध प्रवर्गातील महिला लाभार्थी संख्या उपलब्ध करून द्यावी, तसेच या निधीचा उपयोग त्याच प्रवर्गातील लाभार्थी महिलांना होईल, याची काळजी घेण्याची सूचना केली आहे. सामाजिक न्याय विभागाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना अंतर्गत अर्थसाह्य मिळणाऱ्या राज्यातील महिलांना लाडकी बहीण योजनेचे लाभ मिळणार नाहीत, याची काळजी महिला व बालविकास विभागाने घ्यावी, अशी सूचना सामाजिक न्याय विभागाने केली आहे.

# पोलीस विभागाने कौटुंबिक संरक्षण कायद्यानुसार महिलांच्या सुरक्षेला अधिक प्राधान्य द्यावे

## सोलापूर महानगरपालिकेने कोणत्या कामास किती निधी वापरता यांची माहिती ७ दिवसात सादर करावी : उपसभापती नीलम गोऱ्हे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर,/जिमाका : महिलांवर अत्याचार होऊ नयेत यासाठी पोलीस विभागाने अधिक सतर्क रहावे. साध्या वेषातील पोलिसांची संख्या वाढवावी. भरोसा सेल मध्ये नोंद होणाऱ्या गुन्ह्याबाबत तात्काळ कार्यवाही करून गुन्हे निकाली काढावेत. तसेच समाजातील एकाही महिलावर कोणत्याही प्रकारचा अत्याचार होणार नाही यासाठी पोलीस विभागाने कौटुंबिक संरक्षण कायद्यानुसार महिला सुरक्षेला अधिक प्राधान्य द्यावे असे सूचना विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी दिल्या.

**कौटुंबिक गुन्ह्यांमध्ये जास्तीत जास्त समझोता करत असतांना नुसता नांदण्याचा दबाव आणुन हुंडा , हिंसा , व्यसने स्विकारण्यास भाग पाडून समझोता करू नये. केस हाताळतांनाच्या कार्य प्रणाली तयार करून नंतर दक्षता समिती सदस्यांना व बीट पोलीसांना गृहभेटी देण्यास सांगावे. महिलांच्या सुरक्षिततेची खात्री झाल्यावरच समझोता करावा असे त्यांनी पोलीसांना सांगितले.**

शासकीय विश्रामगृह येथे आयोजित विविध विभागाच्या आढावा बैठकीत विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे बोलत होत्या. यावेळी सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉक्टर सचिन ओंबासे, पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अतिरिक्त आयुक्त रवि पवार, पोलिस उप आयुक्त दिपाली काळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, सोलापूर एस.टी महामंडळाचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी उपस्थित होते.

उपसभापती नीलम गोऱ्हे पुढे म्हणाल्या

### उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्याकडून विविध विभागाचा आढावा

की, महिलांना भरोसा कक्षाच्या माध्यमातून दक्षता समिती सक्षम करण्याची गरज आहे. दक्षता समिती यांनी प्राचार्य,शिक्षीका, प्राध्यापिका, समाजसेविका, सरपंच, समाजसेविका यांना कौटुंबिक संरक्षण कायद्याचे प्रशिक्षण द्यावे. जिल्हा परिषद, महिला बाल विकास विभाग, पोलिस विभाग यांनी एकत्र लोक अदालत आयोजित करण्यात यावी.



जिल्हा परिषदेने महिलांच्या गरजा लक्षात घेऊन पतपेढी, गुंतवणूक, कर्ज उपलब्ध करून महिलांच्या विकासासाठी प्राधान्य द्यावे. महिलांना जास्तीत जास्त शासनाच्या सोयी सुविधा देऊन महिलांना सक्षम करण्याचा प्रयत्न करावा. सोलापूर महापालिकेने नागरिकांना नियमित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करावा तसेच शहरामध्ये स्वच्छता राहील या अनुषंगाने प्रयत्न करावेत. पावसाळ्यातील ड्रेनेज ची कामे व्यवस्थितपणे झाली आहेत की नाहीत याची खात्री करावी. पंढरपूर येथील आषाढी वारीच्या अनुषंगाने एस.टी. स्थानकाची स्वच्छता करावी वारीसाठी एस.टी महामंडळाने सुस्थितीत गाड्या देण्याचे नियोजन करावे, आशा सूचना उपसभापती गोऱ्हे यांनी दिल्या.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी केले वृक्षारोपण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते दूधगंगा व इंदापूर महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या इंदापूर येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या Allumni ssociation ( माजी विद्यार्थी संघटना) च्या वतीने या संघटनेचे अध्यक्ष तसेच राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते इंदापूर

### इंदापूर महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचा उपक्रम

येथील दूधगंगा सहकारी दूध उत्पादक संघ इंदापूर तसेच इंदापूर महाविद्यालयात वृक्षारोपण करून जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.

इंडियन ख्रिसमस ट्री, इंडियन पाम ट्री , मधुमालती अशा पर्यावरणपूरक झाडांचे यावेळी वृक्षारोपण करण्यात आले. इंदापूर महाविद्यालय दरवर्षी जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने एक थीम घेऊन हा दिवस साजरा करते. माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील व सदस्य यासाठी विशेष प्रयत्न करतात. One Nation -One Mission : End Plastic या सदराखाली ५ ते १० जून या कालावधीमध्ये ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

माजी विद्यार्थी संघटनेचे सदस्य ॲड. मनोहर चौधरी, ड.गिरीश शहा, सुरेश मेहेर, मच्छिंद्र शेटे तसेच भूषण काळे, गोपीचंद गलांडे, रघुनाथ राऊत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे , उपप्राचार्य दत्तात्रय गोळे यावेळी उपस्थिती होते.

# डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : यावेळी जागतिक पार्यावरण दिन व माझी वसुंधरा अभियान ६.० निमित्त ग्रुप ग्रामपंचायत मार्फत पर्यावरण वाचविण्याचा दृष्टीने पाऊल उचलून गावात वृक्षलागवड करण्यात आली तसेच प्लास्टिक बंदी बाबत जनजागृती करण्यात आली.

तसेच ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या डोहोळे, कोशिंबी, आन्हे, सोर व कळंबोली अशा पाच गावातील दिव्यांग लाभार्थी यांना सन २०२५-२६ चे दिव्यांग अनुदान मा.सरपंच दिनेश ठाकरे, माजी सरपंच तथा विद्यमान सभासद श्री. सचिन सिताराम घोडविंदे व सदस्य शुद्धोधन जाधव तसेच ग्राम पंचायत अधिकारी परेश सोनावणे यांच्या उपस्थितीत वाटप करण्यात आले.

दिव्यांग लाभार्थी यांना ग्रामपंचायत मार्फत वर्षाच्या सुरुवातीलाच अनुदान मिळाल्यामुळे सर्व दिव्यांग लाभार्थी यांच्या मार्फत आंनद व्यक्त करण्यात आला.

# चाळीसगाव रेल्वे स्टेशन येथे विश्व पर्यावरण दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाळासाहेब अहिरे/चाळीसगाव : विश्व पर्यावरण दिन निम्मित चाळीसगाव रेल्वे स्टेशन येथे एन पी बडगुजर स्टेशन, मॅनेजर विलास मुकणे पाटील मुख्य स्वास्थ्य निरीक्षक, ए सी धिवरे मुख्य तिकीट निरीक्षक तसेच रेल्वे कर्मचारी यांनी चाळीसगाव रेल्वे स्टेशन या ठिकाणी विश्व पर्यावरण दिनानिमित्त जनजागृती करून नागरिकांना विश्व पर्यावरण दिनानिमित्त त्यासंबंधी पर्यावरण रक्षण कसे करावे, असे बॅनरच्या माध्यमातून प्रवासीयांना त्याबद्दल जनजागृती करण्यात आले व तसेच पर्यावरण रॅलीचे आयोजन करण्यात आले व तसेच वृक्षरोपण करण्यात आले.

# प्रत्येकानेच पर्यावरण रक्षक व संवर्धक व्हावे : प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : माणसाने आपले अस्तित्व व आपला सर्वांगीण विकास नैसर्गिक पर्यावरणाच्या विविध घटकांवर अवलंबून असल्याचे माहित असूनही वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी व चंगळवादी वृत्तीमुळे नैसर्गिक पर्यावरणाची अपरिमित हानी केली. हवा, पाणी, जमीन प्रदूषित केली. पुनर्वापर न करता येण्यासारख्या प्लास्टिकचा भस्मासुर तयार केला म्हणूनच पर्यावरणाशी निगडित अनेक दिन साजरे केले जातात. पण ते केवळ उत्सव न होता प्रत्येकाने दैनंदिन जीवनात नैसर्गिक पर्यावरणाच्या रक्षणासाठी व संवर्धनासाठी कृतिशील झाले पाहिजे असे प्रतिपादन प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.




ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा व एकात्मिक बाल विकास नागरी प्रकल्प क्र. १ च्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सावलीचे रोप वाटप व मार्गदर्शन शिबिरात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. प्रमुख अतिथी व उद्घाटक म्हणून एकात्मिक बाल विकास नागरी प्रकल्प क्रमांक १ च्या सुपरवायझर ड. शैलजा मगाई - धुमाळ या होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या साथरोग नियंत्रण अधिकारी डॉ. सुहासिनी वाळवेकर या होत्या.

उद्घाटनपर भाषणात बोलताना ड. शैलजा मगाई - धुमाळ म्हणाल्या की, पर्यावरणाचा समतोल ठेवायचा असेल तर प्रत्येकाने एक झाड लावून ते मोठे होईपर्यंत जतन करावे. प्लास्टिकच्या वापराला पर्याय म्हणून कापडी पिशव्या, पाण्याच्या प्लास्टिकच्या बाटली ऐवजी तांब्याच्या किंवा स्टीलच्या बाटल्यांचा वापर, विद्युत उपकरण वापरण्यासाठी सौर ऊर्जा पॅनलचा वापर, परस बागेची निर्मिती, जागा अपुरी असेल तर कुंडीत फळभाज्या, पालेभाज्यांची लागवड, हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी मातीच्या भांड्यांचा वापर केल्यास पर्यावरण संवर्धन होईल.

या वेळी व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा.डॉ.एन.बी. तेली, व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, बी. एस. सी. मेंबर डॉ. राजीव प्रधान, जोडभावी नागरी आरोग्य केंद्राच्या पी. एच. एन. लता गायकवाड, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

यावेळी आरोग्य दूत म्हणून काम करणाऱ्या सो. म. पा. च्या आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना तुळशीचे व सावलीचे रोप वाटप करण्यात आले.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. वाळवेकर म्हणाल्या की, पर्यावरण संवर्धन हे काम फक्त शासनाचे आहे अशी मानसिकता न ठेवता प्रत्येकाने स्वतःपासून पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न करावा. पर्यावरण संवर्धन म्हणजे फक्त झाडे लावा, झाडे जगवा एवढेच नव्हे तर निसर्गनिर्मित सर्व जीव, जंतू, प्राणीमात्रा व वस्तूंचे जतन करणे हे होय.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. मान्यवरांचा सत्कार प्रा.डॉ.एन.बी. तेली यांनी केला. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार प्रा. डॉ. आयेशा रंगरेज यांनी मानले.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त निफाड येथील उपकेंद्रांमध्ये वृक्षारोपण संपन्न

## व्याख्याने व विविध स्पर्धांचे आयोजन

# निफाड उपविभागात विद्युत सुरक्षा सप्ताह संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महावितरण कंपनीच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात महावितरण तर्फे १ जून ते ६ जून २०२५ पर्यंत सुरक्षा सप्ताह आयोजित करण्यात आलेला होता. या सुरक्षा सप्ताहात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रत्येक गावात वाडेवस्तांवर व शाळा महाविद्यालयांमध्ये जनजागृती पर व्याख्याने व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.. त्याचाच एक भाग म्हणून महावितरणचे निफाड उपविभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी २ जून रोजी. प्रत्यक्ष जाऊन विज ग्राहकांना विद्युत सुरक्षिततेबद्दल माहिती दिली. दिनांक ३ जून व ४ जून रोजी शालेय विद्यार्थी व महावितरणचे पाल्य यांच्याकरिता होरायझन स्कूल व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचे करीता विद्युत सुरक्षा या विषयावर निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती त्यात एकूण २२० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व सदर स्पर्धेमध्ये विजेते विद्यार्थी व स्पर्धकांना महावितरण कडून प्रशस्तीपत्र व ट्रॉफी देण्यात येणार आहे. सदरचे स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्याकरिता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण



संस्था निफाड येथील प्राचार्य शिंदे व होरायझन ॲकॅडमी निफाड च्या प्राचार्या सोनवणे त्यांचे सर्व कर्मचारी वृंद यांचे मोलाचे सहकार्य लाभले, दि ०५ जून २०२५ रोजी महावितरण निफाड उपविभागामार्फत. संपूर्ण निफाड शहरातुन पायी विद्युत सुरक्षा रॅली काढण्यात आली, सदर रॅलीमध्ये महावितरण निफाड उपविभागातील सर्व अधिकारी/कर्मचारी/बाह्यस्त्रोत कर्मचारी, सुरक्षा रक्षक यांनी सहभाग घेऊन रॅली यशस्वी केली.



निफाड शहरातील सर्व ठिकाणी विजेची बचत काळाची गरज, विद्युत सुरक्षा आमची जबाबदारी या घोषणादेत जनजागृती केली रॅली मधे ग्राहकांना विद्युत सुरक्षिततेचे आवाहन करण्यात आले निफाड उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता निलेश नागरे यांचे हस्ते पर्यावरण दिनानिमित्त महावितरण कार्यालयाच्या उपकेंद्रांमध्ये वृक्षारोपण केले,. विविध कार्यक्रमांचे आयोजन करून विद्युत सुरक्षा सप्ताह हा निफाड उपविभागात उत्साही वातावरणात संपन्न झाला आहे. हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्याकरिता महावितरणचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे ,अधीक्षक अभियंता थुल तसेच चांदवड विभागाचे कार्यकारी अभियंता काळू माळी यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी सर्व शाखा अभियंता जनमित्र व बाह्य स्त्रोत कर्मचारी व सर्व यंत्र चालक व सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# भारत जिंदाबाद रॅली; रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया सोलापूर शहर व जिल्हा वतीने राजाभाऊ सरवदे यांच्या नेतृत्वाखाली संपन्न

## भारत माता की जय, भारतीय सैन्याचा विजय असो, अशा देशभक्तिपूर्ण घोषणा देत रॅलीचे शहरात प्रभावी मार्गक्रमण




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी :पाकिस्तानविरुद्ध झालेल्या युद्धात भारतीय सैन्याने अद्वितीय शौर्य दाखवत पाकिस्तानातील अतिरेकी तळ उद्ध्वस्त केले तसेच त्यांच्या ड्रोन हल्ल्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले. या धाडसी सैनिकी मोहिमेचे कौतुक करण्यासाठी आणि अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेल्या भारतीय नागरिक व जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्याच्या उद्देशाने, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात भारत जिंदाबाद रॅली चे आयोजन करण्यात आले.

ही रॅली पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय मंत्री मा. ना. रामदास आठवले साहेब यांच्या आदेशानुसार संपूर्ण राज्यात आयोजित करण्यात आली होती. सोलापूर शहर व जिल्हा स्तरावर ही रॅली पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाली.

रॅलीची सुरुवात पक्ष कार्यालय येथून झाली. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. भारत माता की जय, भारतीय सैन्याचा विजय असो, अशा देशभक्तिपूर्ण घोषणा देत रॅलीने शहरात प्रभावी मार्गक्रमण केले.

यानंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व चार हुतात्मा स्मारक येथे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शेवटी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून राष्ट्रगीताने रॅलीचा समारोप करण्यात आला.

मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू असतानाही सोलापूर शहर व जिल्ह्यातील शेकडो कार्यकर्ते देशप्रेमाने ओथंबून या रॅलीत सहभागी झाले होते.

या प्रसंगी आपल्या भाषणात मा. राजाभाऊ सरवदे साहेब म्हणाले, २२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाम येथे अतिरेक्यांनी भारतीय पर्यटकांवर भ्याड हल्ला केला होता. भारतीय सैन्याने पाकिस्तानातील अतिरेकी तळ उद्ध्वस्त करून त्याचा बदला घेतला. पाकिस्तानकडून असे हल्ले सातत्याने होत राहणार असतील, तर भारतीय सैन्याने युद्ध करून पाकव्याप्त काश्मीर भारताच्या ताब्यात घ्यावा.

या युद्धात महार बटालियनसह तिन्ही दलांच्या (थलसेना, नौसेना, वायुसेना) जवानांनी दाखवलेले शौर्य उल्लेखनीय असून, त्यांच्या कार्याचे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) कडून विशेष अभिनंदन करण्यात आले.

यावेळी सोमनाथ भोसले, रवी गायकवाड,सुनील सर्वगोड, अतुल नागटिळक सर्व तालुका अध्यक्ष व शहरातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# पोलीस निरीक्षक श्री. सुर्यकांत कोकाणे यांची खातेनिहाय चौकशी करुन तत्काळ निलंबित करावे

## आर पी आय इंदापूर ता. अध्यक्ष बाळासाहेब सरवदे यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. सुर्यकांत कोकणे हे इंदापूर पोलीस स्टेशनला रुजू झाल्यपासून त्यांची कारकीर्द वादग्रस्त ठरत आहे. त्यांच्या

कार्यकाळात शहर आणि परिसरात अवैध धंद्यांना तेजीचे व सुगीचे दिवस आलेले आहेत. लाखो रुपयांच्या हप्ता बेकायदेशीर वाळू वसुलीमध्ये ते मश्गुल आहेत. इंदापूर शहरात खुले आम बेकायदेशीर धंदे जसे मटका, गुटखा, उपसा, जुगार, वैश्या व्यवसाय, दारु विक्री, खाजगी सावकारकी इत्यादी बेकायदेशीर धंदे उघडपणे जोमात चालु आहेत. या बेकायदेशीर धंद्या विरोधात आवाज उठवणारे सामाजिक कार्यकर्ते पत्रकार यांचेवर खोटे गुन्हे दाखल करुन, त्यांचा आवाज दाबण्याचा व त्यांचेवर दबाव निर्माण करत आहेत.

इंदापूरचे पोलीस निरीक्षक श्री. सुर्यकांत कोकणे यांची पोलीस स्टेशन हद्दीतील पोलीसांच्या हिट लिस्ट वरील गुंडांसोबत दररोज उठबस होत आहे. त्यामुळे त्यांच्या याकृतीमुळे पोलीसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे. गेल्या काही दिवसांमध्ये इंदापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत गोळीबारासारख्या घटना घडून सुध्दा संबंधीतांवर वचक बसेल अशी कोणतीही कारवाई त्यांच्याकडून झालेली दिसुन येत नाही.

इंदापूर पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हा दिनांक २७/०२/२०२५ रोजी गुन्हा रजि. नं. १६६ / २०२५ अन्वये गुन्हयात कांवर टोळीची साधारणतः ९ आरोपी आहेत. त्यामधील ६ आरोपींना इंदापूर न्यायालयात दिनांक २८/५/२०२५ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यास उशीर झाला म्हणून (डिफॉल्ट बेल) मंजुर झाला आहे.

**सदर गुन्हयातील आरोपी नामे**

१) राजेंद्र उर्फ महादेव भाळे

२) रामदास उर्फ रामा शिवाजी भाळे

(३) नाना भागवत भाळे

४) शुभम उर्फ दादा बापू आटोळे

५) स्वप्निल उर्फ बालाजी बबन वाघमोडे

६) अजय उर्फ भैय्या शिवाजी किसवे

या सराईत गुन्हेगांरानी इंदापूर न्यायालयात जामीनासाठी अर्ज दाखल केलेला होता. त्या जामीन अर्जावर मा. इंदापूर न्यायलयाने सरकारी वकिल व तपासी अधिकारी श्री. सुर्यकांत कोकणे यांचे म्हणणे ऐकूण दिनांक ३०/०५/२०२५ व नमुद आरोपींना डिफॉल्ट बेल च्या आधारे जामीन मंजुर केलेला आहे. त्यामळे मे. सर्वोच्च न्यायालयाच्या Court on its own motion V/s State (IR 2009 SC 2275) मधील निर्णयानुसार असे नमुद केले आहे की, तपास यंत्रणांनी दोषारोपपत्र वेळेवर सादर न केल्यास तो न्यायालयाचा अवमान मानला जाईल. असे नमुद केलेले आहे.

त्याचबरोबर CBI V/s Anil Sharma (1997) मध्ये असे निरिक्षण नोंदवले आहे की, तपासात अपारदर्शकता व जानिवपुर्वक सहकारी केलयास केल्यास तपासी अधिकारीही गुन्हयाचा भाग मानला जाऊ शकतो. वरील मे. सर्वोच्च न्यायालयांचे दोन्हीं निकाल पोलीस निरीक्षक सुर्यकांत कोकणे यांना माहिती असून देखील मा. न्यायालयांचा अवमान केल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. या गुंडावर इंदापूर तालुका, माळशिरस तालुका, दौंड तालुका पोलीस स्टेशनमध्ये विविध कलमाखाली गंभीर गुन्हे दाखल आहेत. गुंड राजू भाळे व त्याच्या साथीदारांवर एम. पी. डी.ए. कायद्यान्वये कारवाई झालेली आहे. गुंड राजु भाळे व त्याच्या इतर साथीदारांवर वालचंदनगर पोलीस स्टेशन येथे २८/०२/२०२५ रोजी गुन्हा रजि. नं. ७२ / २०२५ खुन केल्याचा गुन्हा दाखल आहे. अशा कुख्यात गुंडांना इंदापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. सुर्यकांत कोकणे हे पाठबळ देत आहेत. यामुळे पोलीस प्रशासनाची नाचक्की होत आहे. तरी संबंधीत राजु भाळे या गुंडाच्या टोळीवर विविध पोलीस स्टेशन अंतर्गत अनेक गुन्हे दाखल आहेत. हे माहिती असून देखील इंदापूर पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक तथा तपास अधिकारी सुर्यकांत कोकणे यांनी गुन्हेगारांशी हातमिळवणी करुन जाणूनबुजून दोषोरोपपत्र पाठविण्यास उशीर केल्यामुळे सदर गुन्हयात कुख्यात गुंडाचा मे. कोर्टाने इंदापूर पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नंबर १६६ / २०२५ मध्ये डिफॉल्ट बेल मंजूर केल्यामुळे सामान्य जनतेच्या मनामध्ये पोलीस प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर शंका उपस्थितीत केली जात आहे. व पोलीस प्रशासनच कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याचे काम करीत आहे का? असा प्रश्न सदरचा जामीन मंजुर झाल्यावर पडत आहे.

इंदापूर पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक सुर्यकांत कोकणे यांनी आपल्या सेवेत अनेकदा शिस्तभंग केलेला आहे. सन २०११ साली मनसेचे आमदार हर्षवर्धन जाधव यांच्यावर झालेल्या हल्याप्रकरणी त्यांच्यावर शिस्त भंगाची कारवाई होवून त्यांना निलंबीतही केले होते. याचा अर्थ ते कोणालाही जुमानत नाहीत. ते स्वतः कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याचे काम करतात. अशाप्रकारचे कृत्य करुन पोलीस सेवा अचार संहितेतील उल्लंघन त्यांनी केलेले दिसून येते. सदर पोलीस निरीक्षक श्री सुर्यकांत कोकणे यांनी गुन्हेगारांना पाठबळ देवून, पदाचा गैरवापर केला म्हणून, त्यांच्या विरोधात योग्य कलमान्वये गुन्हा दाखल करावा. इंदापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. सुर्यकांत कोकणे हे पोलीस दलामध्ये सुमारे २५ ते ३० वर्षे कर्तव्य बजावत आहेत त्यामुळे त्यांना कायद्याचे संपुर्ण ज्ञान असावे. तरी सुध्दा त्यांनी जाणूनबुजून स्वतःच्या अर्थिक लोभापायी सदर कुख्यात गुंडांना मदत करण्याच्या हेतुने दोषारोपपत्र पाठविण्यास उशीर स्पष्ट दिसून येत आहे.

तरी मेहेरबानास विनंती की, इंदापूर पोलीस स्टेशनचे लाचखोर पोलीस निरीक्षक श्री. सुर्यकांत कोकणे यांची खाते निहाय चौकशी करुन, त्यांना पोलीस सेवेतुन तत्काळ निलंबीत करावे असे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया इंदापूर ता.अध्यक्ष बाळासाहेब सरवदे यांनी निवेदनाद्वारे पुणे ग्रामीण चे एस पी संदिपसिंग गील यांच्या कडे मागणी केली आहे.

महाराष्ट्र शासन

**औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट, जि. सोलापूर.**

म्हाडा कॉलनी जवळ, स्टेशन रोड, अक्कलकोट.

e-mail : itisoakt@yahoo.com websire http://www.dvet.gov.in

Industrial Training Institute

**या संस्थेत प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५ करीता खालील व्यवसायामध्ये ONLINE पध्दतीने प्रवेश सुरु**

**प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५**

| अ.क्र. | व्यवसाय (ट्रेड) चे नाव | कालावधी | किमान शैक्षणिक पात्रता | उपलब्ध जागा |
|---|---|---|---|---|
| १. | ड्रेसमेकींग | १ वर्ष | SSC पास/नापास | 20 |
| २. | संधाता (वेल्डर) | १ वर्ष | SSC पास/नापास | 40 |
| ३. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | १ वर्ष | SSC पास | 20 |
| ४. | जोडारी (फिटर) | २ वर्ष | SSC पास | 20 |
| ५. | वीजतंत्री (ईलेक्ट्रीशयन) | २ वर्ष | SSC पास | 40 |
| | | | एकुण जागा | 140 |

**✻ वैशिष्ट्ये ✻**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश गुणवत्तेवर व शासकीय नियमा नुसार दिले जातील. | ८. | परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर अखिल भारतीय स्तरावरचे प्रमाणपत्र |
| २. | सुसज्ज प्रशासकीय इमारत व कार्यशाळा. | ९. | अनुभवी व तंत्र निदेशक वर्ग |
| ३. | रोजगार/नोकरीची खात्री देणारे प्रशिक्षण. | १०. | प्रात्यक्षिकावर आधारित प्रशिक्षण |
| ४. | पात्र प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन. दरमहा ५००/- रुपये ८०% उपस्थिती अनिवार्य | ११. | एस.टी पासची सोय |
| ५. | ग्रंथालय सुविधा, सुसज्ज AVTS Room, Computer Lab. | १२. | अद्यायावत वसतीगृह सुविधा |
| ६. | सर्व प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारांना कंपनी मधुन अप्रेंटिशीपची संधी | १३. | निसर्ग रम्य वातावरण |
| ७. | तंत्रनिकेतनास ( Diploma) थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश (अटी लागू) | १४. | ८०% उपस्थिती आवश्यक |

**✻ प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे ✻**

| अ.क्र. | प्रवेश तपशिल | प्रवेशासाठी आवश्यक मुळ कागदपत्रे |
|---|---|---|
| १) | अनुसूचित जाती (SC) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| २) | अनुसूचित जमाती (ST) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| ३) | विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्ग (VJNT-1, NT-2, NT-3) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ४) | इतर मागास प्रवर्ग (OBC) विशेष मागास प्रवर्ग (SBC) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ५) | अपंग, तांत्रिक, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, बोस्टर स्कूल | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, व संबंधीत EWS प्रमाणपत्र |
| ६) | अन्य (OPEN) संवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला |
| ७) | इतर प्रमाणपत्र | NCC, MCC, जिल्हास्तर/राज्यस्तर/राष्ट्रीय क्रिडा स्पर्धा प्रमाणपत्र/रहीवाशी दाखला/तीन फोटो/आधार कार्ड, राष्ट्रीयकृत बँक पास बुक झेरॉक्स, |

✻ आपले प्रवेश अर्ज विहीत मुदतीत https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळा वरुन ऑनलाईन सादर करावे.
✻ प्रवेश माहिती पुस्तिका ही https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
✻ प्रवेश प्रक्रिया ही प्रवेश नियमावलीतील भाग १ व भाग २ दोन नुसार होईल.
प्रवेश प्रक्रिया शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी चालू राहील.
✻

**✻ महत्वाची सुचना ✻**

१) ऑनलाईन प्रवेश भरल्यानंतर उमेदवारांना मिळालेला युजर आयडी व पासवर्ड जतन व नोंद करुन ठेवावा. पुढील प्रवेश प्रक्रियेच्या सर्व टप्पयावर अंतिम प्रमाणपत्र मिळेपर्यंत तो आवश्यक आहे.
२) ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर विहीत शुल्क भरावे.
३) अर्ज निश्चितीसाठी (Confirmation) जवळच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस भेट द्यावी. अर्ज निश्चित झाल्या शिवाय विकल्प (Option) दिसणार नाही.
४) अर्ज निश्चितीची पावती व निश्चित केलेल्या अर्जाची प्रत प्राप्त करून घ्यावी व प्रवेश फेरीच्या वेळी संस्थेत सादर करावी.
५) अर्ज निश्चिती करताना भरलेल्या अर्जाची एक प्रत व सर्व आवश्यक कागदपत्राची झेराक्स प्रत जोडावी. तसेच आवश्यक तेवढ्या प्रती काढून स्वतः जवळ ठेवाव्यात.
६) उमेदवाराने आपला अर्ज भरताना स्वःताचा किंवा आपल्या कुंटुबातील सदस्याचा चालू असलेला मोबाईल क्रमांक व आपला ई-मेल आयडी बिनचूक पणे नोंदवावा. प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी, बदलू नये. नोंदविलेला मोबाईल क्रमांक आपल्या आधार कार्डशी व बँक खात्याशी जोडलेला असणे आवश्यक आहे. त्या शिवाय SID पोर्टलवर आपला PRN जनरेट होणार नाही.
७) निश्चित झालेल्या अर्जाची (Confirmed Application) प्रत व शुल्क भरल्याची पावती जपून ठेवावी.
८) प्रशिक्षणार्थ्याने प्रशिक्षण अर्धवट सोडल्यास पुर्ण प्रशिक्षण शुल्क वसुल करण्यात येईल.
९) प्रवेशाच्या वेळी सर्व मुळ कागदपत्रे व तीन झेरॉक्स सेट सोबत आणावे.
१०) प्रवेश निश्चित झाले नंतर जमा केलेले प्रशिक्षण शुल्क व अनामत रक्कम परत मिळणार नाही.
११) ऑनलाइन स्वरुपात शुल्क स्वीकारले जाणार नाही.

**✻ प्रवेशित उमेदवारांना खालील प्रमाणे शुल्क रोखीने भरावे लागेल. ✻**

| अ.क्र. | व्यवसायाचे नाव | कालावधी | खुल्या गटा करीता वार्षिक शुल्क रुपये (Open) | (Open) Total Rs. | मागासवर्गीया करीता वार्षीक शुल्क रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वीजतंत्री (इलेक्ट्रीशयन) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2000+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3250/- | 02 वर्षे 1250/- |
| 2. | जोडारी (फिटर) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2400+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3650/- | 02 वर्षे 1250/- |
| 3. | वेल्डर (संधाता) | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1200+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 2150/- | 01 वर्षे 950/- |
| 4. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1000+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1950/- | 01 वर्षे 950/- |
| 5. | ड्रेसमेकींग | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 800+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1750/- | 01 वर्षे 950/- |
| 6. | वसतिगृह | | अनामत 1000/वार्षिक शुल्क 1200 | 2200/- | 2200/- |

टीप :
प्रवेशाच्या सविस्तर माहिती साठी संस्थेत प्रत्येक संपर्क साधावा.

प्राचार्य
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट
जिल्हा सोलापूर.

## पोलीस अधीक्षक कार्यालयात जिल्हास्तरीय नार्को को-ऑर्डिनेशन समितीची बैठक संपन्न

# नागरिकांनी हेल्पलाइन क्रमांक १९३३ वर अंमली पदार्थाच्या अनुषंगाने तक्रारी करण्याचे आवाहन : अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**भारत सरकारच्या सन २०४७ पर्यंत नशामुक्त भारत अभियानात सर्वांनी सक्रिय सहभाग घ्यावा**

सोलापूर/जिमाका : केंद्रीय गृह मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो दिल्ली कार्यालयाकडून अमली पदार्थांची विक्री वितरण आणि गैरवापर करणाऱ्या लोकांविरुद्ध नॅशनल नार्कोटिक्स हेल्पलाइन (MNS) क्रमांक १९३३ दिनांक १ जानेवारी २०२५ पासून कार्यान्वित केलेला आहे. ही सेवा २४ तास उपलब्ध असल्याने सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांनी अंमली पदार्थाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची माहिती मिळाल्यास तात्काळ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांनी केले.

**यावेळी कृषी विभाग, शिक्षण विभाग, अन्न व औषध प्रशासन, समाज कल्याण विभाग, टपाल विभाग, राज्य उत्पादन शुल्क, वन विभाग, आरोग्य विभाग व माहिती विभाग यांनी अमली पदार्थाच्या अनुषंगाने करावयाच्या विविध उपाय योजनांची माहिती सविस्तरपणे देण्यात आली.**

पोलीस अधीक्षक कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय नार्कोटिक्स को- ऑर्डिनेशन कमिटीच्या बैठकीत श्री. यावलकर मार्गदर्शन करत होते. यावेळी सहायक आयुक्त अन्न व औषध विभाग श्री. साहेबराव देसाई,अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क श्रीमती भाग्यश्री जाधाव, सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग श्री. अ.स. गोडसे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्रीमती सुलोचना सोनवणे उपस्थित होते.




श्री. यावलकर पुढे म्हणाले की, अंमली पदार्थाच्या तक्रारीच्या अनुषंगाने उपलब्ध करून देण्यात आलेल्या हेल्पलाइन क्रमांक १९३३ ची सर्व संबंधित विभागाने मोठ्या प्रमाणावर नागरिकांमध्ये जागृती करावी. तसेच सर्व समिती सदस्याने २६ जून हा जागतिक अमली पदार्थ विरोधी दिवस साजरा केला जातो, त्या अनुषंगाने शाळा, महाविद्यालय, बस स्थानके, रेल्वे स्टेशन, आठवडी बाजार व सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थाचे दुष्परिणामाबाबत रॅली, पथनाट्य, बॅनर्स, होर्डिंग्ज व स्टिकर्स लावून जनजागृती करावी व त्यातून सन २०४७ पर्यंत भारत सरकारचे नशामुक्त भारत अभियान प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

कृषी विभागाने यावर्षी सुरू होणाऱ्या खरीप हंगामात पीक लागवडी सोबत गांजा व खसखस यासारख्या मादक पिकांची लागवड होणार नाही याची दक्षता घ्यावी. अन्न व औषध विभागाने जिल्ह्यातील सर्व मेडिकल स्टोअर्स यांना ग्राहकास औषधेही डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय विक्री करू नये या अनुषंगाने सूचना द्याव्यात असे अतिरिक्त पोलीस अध्यक्ष श्री यावलकर यांनी सांगून पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण कार्यालयाकडून अमली पदार्थविरोधी विशेष मोहिमेच्या काळात ५१ कारवाया करण्यात आल्या तर पोलीस आयुक्त कार्यालय सोलापूर शहर यांच्याकडून १७ कारवाया करण्यात आल्याची ही माहिती दिली.